
जुलै-सप्टेंबर २०१७ | वर्ष ११ वे | अंक ३ रा | मूल्य : रु. २०/-
ISSN 2229-32

# यशदा • यशमंथन

- कार्यकुशलतेची दिशा.....
- शासन, सुशासन आणि सुप्रशासन
- प्रगत व्यवस्थापनशास्त्र आणि लोकाभिमुख प्रशासन
- माणसाला बदलणारे तत्त्वज्ञान...
- 'झेड' सुरक्षेतील सीईओ.....
- प्रशासकीय नैतिक मूल्यांची जोपासना : काळाची गरज



ADARSH VYAPARI EDUCATION SOCIETY'S DEGLOOR COLLEGE, DEGLOOR

Dr. Anil Chidrawar
I/C Principal
A.V. Education Society's
Degloor College, Degloor Dist.Nanded

यशदा
यशवंतराव चव्हाण विकास प्रशासन प्रबोधिनी, पुणे

ADAT VYAPARI EDUCATION SOCIETY'S
DEGLOOR COLLEGE, DEGLOOR
Dist. Nanded

यशदा

# यशदा • यशमंथन

ISSN 2229-3256

जुलै-सप्टेंबर २०१७
वर्ष ११ वे । अंक ३ रा
मूल्य : रु. २०/-

प्रेरणा
आनंद लिमये भाप्रसे
महासंचालक

मार्गदर्शन
सोनाली पोंक्षे-वायंगणकर भाप्रसे
उपमहासंचालक

नरेश झुरमुरे भावसे
उपमहासंचालक

संपादक
डॉ. बबन जोगदंड
संशोधन अधिकारी (प्रकाशन)

संपादक मंडळ
डॉ. शशिकांत लोखंडे
अतिरिक्त संचालक

मांडणी व सजावट
संजीवनी रणदिवे

## अ | नु | क्र | म | णि | का

| | | |
|---|---|---|
| ■ संवाद | – आनंद लिमये | २ |
| ■ शासन, सुशासन आणि सुप्रशासन | – जीवन मुळे | ३ |
| ■ प्रगत व्यवस्थापनशास्त्र आणि लोकाभिमुख प्रशासन | – डॉ. वि.ल. धारूरकर | ६ |
| ■ प्रशासकीय नैतिक मूल्यांची जोपासना : काळाची गरज | – डॉ. बी. आर. कतुरवार | ९ |
| ■ कार्यकुशलतेची दिशा..... | – सुरेश वांदिले | १४ |
| ■ 'झेड' सुरक्षेतील सीईओ .....? | –इ. झेड. खोब्रागडे | १७ |
| ■ मातीचे ऋण फेडण्याची प्रेरणा देणारे औरंगाबादचे विभागीय आयुक्त | –डॉ. विजयकुमार फड | २१ |
| ■ माणसाला बदलणारे तंत्रज्ञान : जीन एडिटिंग | –डॉ. अरविंद कुलकर्णी | २५ |
| ■ आपली आत्मशक्ती ओळखा व यश प्राप्त करा | –डॉ. रेणुका भावसार | २८ |
| ■ सद्सद् विवेक : पुस्तक परिचय | –डॉ. बबन जोगदंड | ३१ |

३
वर्षांची वर्गणी
रु.२००/-

यशदा यशमंथनसाठी लेख, वर्गणी, जाहिरातीसाठी पत्ता :
संशोधन अधिकारी (प्रकाशन), यशवंतराव चव्हाण विकास प्रशासन प्रबोधिनी (यशदा),
राजभवन आवार, बाणेर रोड, पुणे ४११ ००७. दूरध्वनी : ०२०-२५६०८२२७
ई-मेल : editoryashmanthan@yahoo.in वेबसाइट: http://www.yashada.org

या अंकातील सर्व मते लेखकांची असून त्यांच्याशी
संपादक व 'यशदा' सहमत असेलच असे नाही.



ADAT VYAPARI EDUCATION SOCIETY'S
DEGLOOR COLLEGE, DEGLOOR
Dist. Nanded

# प्रशासकीय नैतिक मूल्यांची जोपासना : काळाची गरज

-डॉ.बी.आर. कत्तुरवार

**लोकप्रशासनात नैतिक मूल्य ही अत्यंत महत्त्वाची संकल्पना आहे. सर्वसाधारणपणे प्रशासनातील नैतिक मूल्यांचा विचार केल्यास प्रामुख्याने प्रामाणिकपणा, सत्यानिष्ठा, वक्तशीरपणा, सचोटी, आत्मीयता, जनकल्याण, जबाबदारीची भावना इत्यादी मूल्ये ही लोकप्रशासनातील नैतिक मूल्य म्हणून ओळखली जातात. अलीकडच्या काळात नीती मूल्यांचा ऱ्हास मोठ्या प्रमाणात होत असून, त्याचा प्रतिकूल परिणाम प्रशासनाच्या कार्यक्षमतेवर पडत आहे.**

**प्राचीन** वैभवशाली संस्कृतीचा वारसा लाभलेल्या भारत देशात मानवी जीवनाला आकार देण्याचे कार्य विविध घटकांनी केले आहे. जागतिक पातळीवर नैतिक अधिष्ठान लाभलेली संस्कृती म्हणून भारतीय संस्कृतीचा उल्लेख केला जातो. भारतीय संस्कृतीमधील काही अपवादात्मक बाबी सोडल्या तर आदर्श मानवी जीवन कसे जगावे? याविषयी जगाला मार्गदर्शन करण्याचे सामर्थ्य भारतीय संस्कृतीमध्ये आहे. प्रत्येक देशातील प्रशासन व्यवस्थेची निर्मिती तेथील संस्कृतीचा अभ्यास करून केली जाते. प्रशासन व्यवस्थेचीदेखील स्वतंत्र प्रशासकीय संस्कृती असते. या प्रशासकीय संस्कृतीचा आत्मा म्हणजे प्रशासनातील नैतिक मूल्य आहेत. भारतीय प्रशासनाला मानवी नीती मूल्यांचा चेहरा देण्याचे कार्य अनेक प्रशासक व अभ्यासकांनी केला आहे.

लोक प्रशासनात नैतिक मूल्यांचे संवर्धन ही बाब कार्यक्षमतेच्या दृष्टीने सर्वाधिक महत्त्वाची आहे. प्रशासन व्यवस्थेतील वरिष्ठ अधिकाऱ्याने एखाद्या लिपिकाकडे विशिष्ट काम सोपविल्यास ते कार्य जबाबदारी म्हणून पार पाडणे यापेक्षा ते माझे कर्तव्य आहे ही जाणीव ठेवून कार्य करणे अधिक महत्त्वाचे असते; परंतु अलीकडच्या काळात पाश्चिमात्य भोगवादी संस्कृतीचा व जीवनप्रणालीचा प्रभाव भारतीय समाजव्यवस्थेवर मोठ्या प्रमाणात पडला आहे. त्यास प्रशासन व्यवस्थेतील अधिकारी-कर्मचारी देखील अपवाद नाही. खा,प्या व मजा करा Eat, Drink and be merry या भोगवादी विचारांच्या अंधानुकरणामुळे प्रशासनात नीतिमूल्यांचा ऱ्हास मोठ्या प्रमाणात होत आहे.

## प्रशासकीय नीती-मूल्यांचा अर्थ

लोकप्रशासनात नैतिक मूल्य ही अत्यंत महत्त्वाची संकल्पना आहे. सर्वसाधारणपणे प्रशासनातील नैतिक मूल्यांचा विचार केल्यास प्रामुख्याने प्रामाणिकपणा, सत्यानिष्ठा, वक्तशीरपणा, सचोटी, आत्मीयता, जनकल्याण, जबाबदारीची भावना इत्यादी मूल्ये ही लोकप्रशासनातील नैतिक मूल्य म्हणून ओळखली जातात. अलीकडच्या काळात नीती मूल्यांचा ऱ्हास मोठ्या प्रमाणात होत असून त्याचा प्रतिकूल परिणाम प्रशासनाच्या कार्यक्षमतेवर पडत आहे. प्रशासनात भ्रष्टाचार, बेजबाबदारपणा, असंवेदनशीलता, दप्तर दिरंगाई इत्यादी दोष निर्माण झाले आहेत.

## प्रशासनात नैतिक मूल्यांची आवश्यकता

लोकप्रशासनासह सर्वच सामाजिक शास्त्रामध्ये व सर्व प्रशासकीय कार्यालयामध्ये कायदा व नियमाप्रमाणेच नैतिक मूल्यांना महत्त्व

देणे अत्यंत आवश्यक आहे. कारण मानवी वर्तनावर नियंत्रण ठेवण्यासाठी कायदा, नियम, वरिष्ठ अधिकारी, दंडशक्ती या विविध घटकापेक्षा नैतिक मूल्य अधिक प्रभावी ठरू शकतात. त्यासाठी समाज मनावर नैतिक मूल्य जोपासण्याची सवय विकसित करणे अत्यंत आवश्यक आहे. इंग्रजी साहित्यात एका लेखकाने नीतीमूल्यांची आवश्यकता सांगताना असे म्हटले आहे की,when money is loss nothing is loss, when Health is loss something is loss but when character (ethics) is loss everything is lost.

थोडक्यात आपली संपत्ती किंवा वित्त गेली तर आपले काही नुकसान होत नाही, शरीराचा एखादा भाग किंवा अवयव निकामी झाल्यास आपले थोडे काही नुकसान होईल, पण चारित्र्य गमावल्यास सर्वस्व गमावल्यासारखे होते. म्हणून चारित्र सांभाळणे किंवा नैतिक मूल्य जपणे अत्यंत आवश्यक आहे. नीतिमूल्यांची आवश्यकता खालील बाबीवरून स्पष्ट होते.

## १) प्रशासनातील दोष दूर करण्यासाठी

गावपातळीवरील प्रशासनापासून ते देशपातळीवर प्रशासनात कमी अधिक प्रमाणात भ्रष्टाचार, बेजबाबदारपणा, दफ्तर दिरंगाई, असंवेदनशीलता इत्यादी दोष दिसून येतात. या सर्व समस्या कशामुळे उद्भवल्या याचा आपण शोध घेतल्यास त्याचे मुख्य कारण नीती मूल्याच्या संवर्धनाकडे झालेले दुर्लक्ष होय. भारतीय गणितशास्त्रामध्ये अशी नोंद आहे की, गणिताच्या शिक्षकाने विद्यार्थांना उदाहरण देताना एका माणसाने दोन लिटर दुधात एक लिटर पाणी मिसळले व ते दूध ठराविक दराने विक्री केल्यास त्यास नफा किती टक्के होईल? अशा स्वरूपाचे उदाहरण देखील शिक्षकाने देऊ नये, अशी नैतिक मूल्य जोपासणारी पद्धती होती. सारांश प्रशासनातील सर्व अधिकारी-कर्मचारी वर्गाने नैतिक मूल्यांची जोपासना करणे, नीतीयुक्त आचरण ठेवणे अत्यंत आवश्यक आहे.

## २) सुप्रशासनाच्या निर्मितीसाठी

सुप्रशासनाच्या निर्मितीसाठी दक्ष व कार्यक्षम प्रशासन यंत्रणा असावी लागते. लोकप्रशासनात चांगलेपणा आणण्यासाठी प्रशासकीय अधिकारी कर्मचारी वर्गाला वेळोवेळी प्रशिक्षण वर्गाच्या माध्यमातून नीतीमूल्यांची शिकवण देणे आवश्यक आहे. सी. एल. बागेल व योगेंद्र कुमार या लेखकांनी प्रशासनातील नीतिमत्ता ही सुप्रशासनाकडे नेणारी वाटचाल आहे, असे म्हटले आहे.

## ३) सनदी सेवकांच्या वर्तनावर नियंत्रण ठेवण्यासाठी

प्रशासकीय अधिकारी-कर्मचारी वर्गाला जनकल्याणाचे विविध कामे उत्तम रीतीने करता यावीत म्हणून शासनाकडून त्यांना अधिकार प्रदान केले जातात; पण कित्येकदा अधिकारी वर्ग मिळालेल्या अधिकाराचा दुरुपयोग करून स्वार्थ साधत असतात, तर काही अधिकारी जनतेला भीती दाखवून अधिकाराचा दुरुपयोग करीत असतात. प्रशासनात जर नैतिक मूल्यांच्या जोपासनेवर अधिक भर दिल्यास ते अधिकाराचा दुरुपयोग करणार नाहीत. मनाचे नियंत्रण हे कायदेशीर नियंत्रणापेक्षा अधिक प्रभावी व उत्तम [illegible] प्रशासनात नैतिक मूल्यांची जोपासना करणे अत्यंत आवश्यक आहे.

## ४) अधिकारी, नागरिक संबंध सलोख्याचे राखण्यासाठी

लोकप्रशासनातील प्रत्येक अधिकारी कर्मचारी हा जनतेचा नोकर असतो परंतु त्यांना नैतिक मूल्यासंदर्भात योग्य शिकवण मिळाली नाही तर आपण जनतेचे नोकर नसून, मालक आहोत, अशी भावना त्यांच्या मनात निर्माण होत असते. परिणामी अधिकारी-नागरिक यांच्यात संघर्ष उद्भवतो. यातून अनेक समस्या निर्माण होत असतात. त्यासाठी अधिकारी व नागरिक या दोन्ही घटकांना नैतिक मूल्यांची योग्य शिकवण देणे अत्यंत आवश्यक आहे. नैतिक मूल्यांची जोपासना केल्यास त्यांच्यात मैत्रीपूर्ण संबंध निर्माण होतात.

## ५) कार्यक्षमतेत वाढ करण्यासाठी

शासनाच्या ध्येय धोरणाची प्रभावीपणे अंमलबजावणी प्रशासकीय अधिकारी कर्मचारी करीत असतात. अंमलबजावणीचे कार्य यशस्वीरीत्या पूर्ण करण्यासाठी कार्यक्षम व प्रभावी अशी प्रशासन यंत्रणा आवश्यक असते. लोकप्रशासनातील अधिकारी वर्गाची कार्यक्षमता वाढविण्यासाठी प्रशिक्षण सत्र, नियम, उपनियम, आचार संहिता, शिस्तभंगाची कार्यवाही इत्यादी मार्गाचा अवलंब केला जातो.

अधिकारी वर्गाची कार्यक्षमता वाढविण्यासाठी या विविध मार्गापेक्षा अत्यंत प्रभावी मार्ग म्हणजे नैतिक मूल्यांची जोपासना करणे होय. जर

ADAT VYAPARI EDUCATION SOCIETY'S DEGLOOR COLLEGE DEGLOOR Dist. Nanded

नैतिक मूल्यांचे महत्त्व योग्य रीतीने पटवून दिले तर अधिकाऱ्यांच्या कार्य क्षमतेत निश्चितपणे वाढ होऊ शकते.

### प्रशासनातील नीतीमूल्यांविषयी तत्त्वे (घटक)

भारतीय लोकप्रशासनात अनेक नीतीमूल्ये कार्यरत आहेत. लोकप्रशासनातील नैतिक मूल्यांचा विचार केल्यास त्यात कार्यकुशलता, सत्यनिष्ठा, वक्तशीरपणा, कायद्याप्रती आस्थेची भावना, लोककल्याणाची भूमिका, प्रामाणिकपणा, नि:पक्षपातीपणा, लोकशाही व संविधान मूल्यांचा आदर इत्यादी नैतिक मूल्य दिसून येतात. त्यांची सविस्तर विश्लेषण खालीलप्रमाणे आहे.

#### १. सत्यनिष्ठा

भारतीय समाज व्यवस्थेत सत्यनिष्ठ आचरण हे चरित्र संवर्धनासाठी अत्यंत आवश्यक बाब मानली जाते. असे म्हटले जाते की, सत्य हे काही काळ लपविता येते पण ते कधीही नष्ट होऊ शकत नाही. प्रशासनातील प्रत्येक घटकाला कायदा व नियमाला अनुसरूनच कार्य करावे लागते. त्यात असत्यता किंवा खोटेपणा आढळल्यास सबंधित व्यक्तीला शिस्तभंगाच्या कार्यवाहीला सामोरे जावे लागते. लोकप्रशासनातील सर्व अधिकारी कर्मचारी वर्गाला विविध प्रशासकीय कामे करताना सत्यनिष्ठ असावेच लागते. तसेच वैयक्तिक जीवनातदेखील सत्यनिष्ठ आचरण असणे अत्यंत आवश्यक आहे.

#### २. वक्तशीरपणा व वेळ व्यवस्थापन

ज्याप्रमाणे व्यक्ती पैशाचे व्यवस्थापन जेवढे उत्तम रीतीने करीत असतो, तितकेच कर्मचाऱ्यांच्या वेळेचे व्यवस्थापन करणे व त्याचे काटेकोरपणे पालन करणे अत्यंत आवश्यक असते. वक्तशीरपणा म्हणजे योग्य कार्य योग्य वेळेत पूर्ण करणे होय. वेळ ही नेहमीच एक दुर्मिळ संपत्ती मानली जाते. वेळेचा वापर योग्य ठिकाणीच केला पाहिजे. वेळ ही मौल्यवान संपती आहे, त्यामुळे योग्य वेळी योग्य काम करण्याची सवय प्रत्येक व्यक्तीसाठी आवश्यक आहे. आपले वर्तन हे वक्तशीर व शिस्तबद्ध राहील याची काळजी प्रत्येकाने घेतले पाहिजे. त्यामुळे आपला आणि आपल्या सहकाऱ्याचा वेळ वाया जाणार नाही.

#### ३. कार्यकुशलता

प्रशासकीय अधिकारी कर्मचारी वर्गामध्ये केवळ कौशल्य (Skill) असून चालत नाही तर कृतीपेक्षाही अधिक महत्त्वाची वृत्ती व मानसिकता होय. काम करणे व मन लावून काम करणे या दोन बाबी भिन्न आहेत. त्याप्रमाणे आपल्या जवळ असलेले प्रशासकीय कौशल्य हे जनसेवेचे एक महत्त्वपूर्ण साधन आहे. ते कौशल्य समर्पित भावनेने जनसेवेसाठी वापरावे हेच मूलभूत कर्तव्य आहे. याची जाणीव अधिकारी वर्गाला करून देणे आवश्यक आहे.

#### ४. प्रामाणिकपणा

लोकप्रशासनातील अधिकारी-कर्मचारी जनसेवेचे कार्य अविरतपणे करीत असतात. अनेकदा ही जनसेवेची कामे करीत असताना भ्रष्टाचार करून स्वार्थ साधत असतात तर काही ठिकाणी कामचुकारपणा, असंवेदनशीलता, आळस, बेजबाबदार दाखवून कर्तव्य पालनाकडे दुर्लक्ष केले जाते. जर संबंधित अधिकारी वर्गाला नैतिक मूल्याविषयी जागरूक केले तर ते प्रामाणिकपणे कार्य करू लागतात. शासनाने ठरविलेली ध्येय उद्दिष्टे साध्य करण्यासाठी प्रत्येक अधिकारी-कर्मचारी प्रामाणिकपणे आपले कर्तव्य पार पडणे आवश्यक आहे.

#### ५. संविधान व कायद्याप्रती आदरभाव

लोकप्रशासनात असंख्य अधिकारी-कर्मचारी सेवा करीत असतात. त्यातील प्रत्येकाचे अधिकार, कार्य, कार्यक्षेत्र इत्यादी बाबी संविधान व विविध कायदे व नियमाद्वारे निर्धारित केले जातात.त्यामुळे लोकप्रशासनातील अधिकारी कर्मचारी वर्गाला संविधान व कायदा यांच्याबद्दल आदर असणे आवश्यक आहे. संविधानातील स्वातंत्र्य, समता, न्याय व बंधुता या आदर्श मानवी मूल्याविषयीदेखील श्रद्धा असली पाहिजे.

#### ६. इतर तत्त्वे

अ. अधिकाऱ्यांनी सार्वजनिक साधनसामग्रीचा व्यक्तिगत कामासाठी वापर करू नये.

ब. अधिकाऱ्यांनी लोकांकडून कोणत्याही स्वरुपात शुभेच्छापर भेटवस्तू स्वीकारू नयेत.

क. प्रशासकीय कार्य करीत असताना कोणत्याही व्यक्तीकडे पूर्वग्रहदूषित दृष्टिकोनातून पाहू नये.

ड. प्रत्येक अधिकारी-कर्मचाऱ्याने आपल्या चुकांची जबाबदारी स्वत: स्वीकारावी.

ADAT VYAPARI EDUCATION SOCIETY'S DEGLOOR COLLEGE, DEGLOOR Nanded

## प्रशासकीय नैतिक मूल्यांच्या ऱ्हासाची कारणे

मानवाने ज्ञान, विज्ञान व तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात नेत्रदीपक क्रांती केली आहे. त्यामुळे मानवी जीवनात आमूलाग्र बदल झाला आहे. जग एखाद्या खेड्याप्रमाणे खूप जवळ आले आहे. संगणक, इंटरनेट, मोबाईल, टी.व्ही., ईमेल, वेबसाईट इत्यादी आधुनिक माहिती-तंत्राचा प्रशासनात मोठ्या प्रमाणात उपयोग केला जात आहे. ही चांगली बाब असली तरीही पाश्चिमात्य संस्कृतीच्या अंधानुकरणामुळे समाजात व प्रशासन व्यवस्थेत नैतिक मूल्यांचा ऱ्हास होत आहे. प्रशासनातील नैतिक मूल्यांच्या ऱ्हासाला खालील घटक कारणीभूत ठरले आहेत.

### १. पाश्चिमात्य संस्कृतीचा प्रभाव

भारतीय संस्कृतीचा मूलाधार म्हणून मानवतावाद, नैतिकता, सत्यनिष्ठा, बंधुता, ऐक्य इत्यादी मूल्यांचा उल्लेख केला जातो; परंतु मागील काही वर्षापासून आधुनिक विचारांचे वारे वेगाने वाहत आहे. खा, प्या व मजा करा अशा भोगवादी विचारांचा प्रभाव तरुण पिढीवर मोठ्या प्रमाणात वाढला आहे. त्याचा परिणाम त्यागाची परंपरा असलेला भारतीय समाज नैतिक मूल्यांकडे दुर्लक्ष करीत आहे. या बाबीस प्रशासन यंत्रणादेखील अपवाद नाही. प्रशासन व्यवस्थेतील अधिकारी-कर्मचारी वर्गदेखील नैतिक मूल्यांच्या जोपासनेकडे दुर्लक्ष करून स्वकेंद्रित बनत चालला आहे.

### २. सर्वश्रेष्ठ व वेगळेपणाची भावना

लोकप्रशासनातील अधिकारी व कर्मचारी वर्गाला कायद्यानुसार महत्त्वपूर्ण अधिकार मिळालेले असतात. त्यामुळे त्यांचे स्थान सर्व सामान्य व्यक्तीपेक्षा श्रेष्ठ बनत असते. आपण जनतेचे सेवक नसून नियंत्रक आहोत किंवा मालक आहोत, अशी त्यांची भावना बनत असते. परिणामी आपण सर्व श्रेष्ठ वेगवेगळे आहोत अशी अधिकारी वर्गाची मानसिकता बनल्यामुळे ते आत्मकेंद्रित बनतात. परिणामी त्यांच्या व्यक्तिमत्त्वातून नैतिक मूल्यांची घसरण होते.

### ३. औपचारिकतेला महत्त्व

शासनाने आखलेल्या ध्येय धोरणाची अंमलबजावणी करण्याची मुख्य जबाबदारी प्रशासन यंत्रणेची असते. किंबहुना प्रशासकीय अधिकारी वर्गाच्या भूमिकेवरच शासकीय धोरणाचे यशापयश अवलंबून असते. अनेकदा शासकीय योजनांची अंमलबजावणी करतांना मूळ हेतूकडे दुर्लक्ष केले जाते व केवळ कागदोपत्री योजना राबवून औपचारिकता पूर्ण केली जाते. जो उद्देश समोर ठेवून योजना आखली त्यास तिलांजली देणे व औपचारिकतेला महत्त्व देणे अशी त्यांची औपचारिक मानसिकता बनते. परिणामी अधिकारी वर्गाला नीतिमूल्यांचा विसर पडतो व औपचारिकतेला महत्व आणि कर्तव्याकडे दुर्लक्ष करण्याची प्रवृत्ती वाढते.

### ४. संकुचित मानसिकता

पूर्वीच्या काळी 'मरावे परी कीर्ती रूपी उरावे' असा आदर्श संदेश देणारी भारतीय जीवन पद्धती होती. पण अलीकडच्या काळात अधिकारी वर्गासह सर्वसामान्य नागरिकांची मानसिकता संकुचित बनली आहे. मी आणि माझे कुटुंब या पलीकडचा विचार करण्यास अधिकारी तयार नाहीत. साहजिकच उपेक्षित, शोषित, पीडित जनतेची सेवा करणे, गरजवंतांना मदत करणे अशी सामाजिक बांधिलकीची मानसिकता कमी होत चालली आहे. संकुचित विचारसरणीमुळे नैतिक मूल्यांचा ह्रास मोठ्या प्रमाणात होत आहे.

### ५. इतर कारणे:

अ लोकप्रशासनातील काही अधिकारी-कर्मचारी वर्गावर राजकीय पुढाऱ्यांचा वरदहस्त असतो. अशा अधिकारी कर्मचाऱ्यांचे वर्तन इतरांपेक्षा भिन्न असलेले दिसून येते.

ब) लोकप्रशासनातील भ्रष्टाचाराचे वाढते प्रमाण पाहता प्रशासकीय कार्यालयात होणारी चचदिखील वेतनाशिवाय होणाऱ्या कमाईशी संबंधित असते. परिणामी नैतिक मूल्यांचा ऱ्हास होतो.

क प्रशासनातील अनेक अधिकारी कर्मचारी व्यसनाच्या आहारी गेलेले दिसून येतात. धूम्रपानाच्या विविध सवयी लागलेला अधिकारी वर्ग व्यसनामध्येच अधिक वेळ घालवत असतो. साहजिकच त्यांचे आपल्या मूळ कर्तव्याकडे दुर्लक्ष होते.

ड) लोकप्रशासनातील अधिकारी कर्मचाऱ्यांच्या सर्व सामान्य जनतेकडे पाहण्याचा नकारात्मक दृष्टिकोन असतो. एखाद्या सामान्य माणसाला कायदा, नियम व उपनियमाची भीती दाखवायची आणि गुंड प्रवृत्तीचा किंवा राजकीय हित संबंधातील लोकांची कामे त्वरित पूर्ण

स्वत:च्या मार्गाविषयी संयमी व सहनशील रहा.

ADARSH EDUCATION SOCIETY'S DEGLOOR COLLEGE, DEGLOOR Dist.Nanded

करायची अशी काही अधिकाऱ्याची मानसिकता बनल्यामुळे नैतिक मूल्यांचा ऱ्हास होतो.

**प्रशासनातील नीती मूल्यांच्या संवर्धनासाठीचे उपाय**

लोकप्रशासनातील अधिकारी कर्मचारी नैतिक मूल्यासंदर्भात जागरूक व दक्ष असतील तर प्रशासनव्यवस्था निश्चितपणे कार्यक्षम व भ्रष्टाचारमुक्त बनते. त्यासाठी संपूर्ण समाज व्यवस्थेचे लक्ष नैतिक मूल्यांकडे वेधणे आवश्यक आहे. नैतिक मूल्यांच्या संवर्धनासाठी खालील उपाय महत्वपूर्ण आहे.

**१. चारित्र्य संवर्धनास महत्त्व**

भारतीय संस्कृतीमध्ये वित्तापेक्षा चारित्र्य संवर्धनास महत्त्व दिले आहे, परंतु अलीकडच्या काळात वित्त आणि संपतिलाच सर्वाधिक महत्त्व प्राप्त होत आहे. परिणामी चारित्र्य, नीतीमूल्य, मानवी भावभावना, या अमूर्त संकल्पनांना कमी महत्त्व दिले जात आहे, ही परिस्थिती बदलण्यासाठी समाज व्यवस्थेत चारित्र्य संवर्धनास प्रोत्साहन देणे आवश्यक आहे.

**२. जनतेप्रती सकारात्मक दृष्टिकोन**

लोकप्रशासनातील अधिकारी कर्मचारी वर्गामध्ये जनतेप्रती आपुलकीची किंवा आदराची भावना फारशी दिसून येत नाही. जेव्हा नागरिक समस्यांच्या निवारणासाठी अधिकारी वर्गाकडे अर्ज किंवा विनंती करीत असतो तेव्हा त्या समस्या निवारणासंदर्भात अधिकाऱ्यांची फारशी सहकार्याची वृत्ती दिसून येत नाही उलट त्यांना धाक किंवा दबदबा दाखविण्याची मानसिकता दिसून येते. या मानसिकतेत बदल करून जनसेवा हीच खरी ईश्वर सेवा आहे याची जाणीव अधिकारी वर्गाला करून देणे आवश्यक आहे.

**३. उत्तरदायित्वाची भावना वाढीस लावावी**

लोकप्रशासनातील प्रत्येक अधिकारी-कर्मचारी हा आपल्या कार्याबद्दल जनतेला उत्तरदायी असला पाहिजे. कायद्यानुसार प्रत्येक अधिकाऱ्याकडे जी जबाबदारी सोपवलेली आहे ती पार पडणे त्यास कायदेशीर व नैतिक दृष्टीने बंधनकारक असली पाहिजे अर्थात वरिष्ठ पदावरील अधिकाऱ्यामध्ये उत्तरदायित्वाची भावना असल्यास कनिष्ठ कर्मचारी वर्गात आपोआपच ती भावना विकसित होत असते.

**४. प्रशासकाचे आचरण आदर्श असावे**

'यथा राजा तथा प्रजा' ही म्हण जशी प्रचलित आहे त्याचप्रमाणे यथा प्रशासक तथा कर्मचारी या तत्त्वानुसार कर्मचारी वर्तन करीत असतात. त्यासाठी मुख्य प्रशासकाने आपले आचरण सदैव नैतिकतेला धरूनच ठेवले पाहिजे. वरिष्ठांचे वर्तन, विचार, दृष्टिकोन, वृत्ती, मानसिकता, नैतिक अधिष्ठानयुक्त असेल तर त्या कार्यालयातील सर्व कर्मचारी नैतिक मूल्यांचे पालन करू लागतात .

मानवी जीवनात नैतिक वर्तन हे आदर्श जीवन पद्धतीचा मूलाधार मानले जाते. आपले वर्तन कायदा व नियमाला धरून तर असलेच पाहिजे पण त्याचबरोबर त्याला नैतिकतेची किनार असणदिखील अधिक महत्त्वाचे आहे. या संदर्भात नार्मन विनसेंट व कैनेथ ब्ल्याकार्ड यांनी The power of Eethical management या ग्रंथात असे म्हंटले आहे की, एखाद्या प्रशासकीय अधिकाऱ्याने घेतलेला निर्णय जर कायदेशीर नसेल तर तो नैतिकदेखील राहणार नाही. प्रशासकाने नि:पक्षपातीपणे व सार्वजनिक हिताला महत्त्व देऊन निर्णय घेतला पाहिजे पण जर प्रशासकाने पक्षपाती स्वरूपाचा निर्णय घेतला तर तो नैतिकदेखील असणार नाही. सारांश प्रशासन व्यवस्थेतील कोणत्याही स्तरावरील अधिकारी कर्मचारी असो त्याने घेतलेला निर्णय व प्रत्येक कृती कायद्याच्या चौकटीत असली पाहिजे. त्यांचा हेतू चांगला असला पाहिजे. तरच इतर कनिष्ठ व्यक्तीवर त्याचा नैतिक प्रभाव पडत असतो.

■■■

डॉ. बी. आर. कत्तुरवार
विभागप्रमुख,
लोकप्रशासन विभाग व संशोधन केंद्र
देगलूर महाविद्यालय, देगलूर, जि.नांदेड
संपर्क : ९४२३३०५८७०
ई-मेल :brkattruwar@gmail.com

भीतीमुळे मागे राहून जाऊ नका.

Dr. Anil Chidrawar
I/C Principal
A.V. Education Society's
Degloor College, Degloor Dist.Nanded